# कालचक्र.

लेखक
' राधारमण '

प्रकाशक—हिंदएजन्सी माधवबाग मुंबई.

किंमत ८ आणे.

# कालचक्र.

लेखक

राधारमण ऊर्फ कृष्णाजी पांडुरंग लिमये.

प्रकाशक

हिंद एजन्सी माधवबाग नं. ४ मुंबई.

मुद्रकः--रावजी श्रीधर गोंधळेकर,

जगद्धितेच्छु प्रेस पुणें-सिटी.

किंमत ४ आणे.

सर्व हक्क लेखक व प्रकाशक यांनीं स्वाधीन

ठेविले आहेत.

# अर्पणपत्रिका.

रा. रा. पुरुषोत्तम अनंत जोशी
जनरल मर्चंट केप टाऊन साऊथ आफ्रिका.

रा. रा. केशव वासुदेव मनोहर.
झोला असिस्टंट शिराटी जर्मन ईस्ट आफ्रिका.

रा. रा. रामचंद्र गणेश दांडेकर.
झोला असिस्टंट डारसालम् जर्मन ईस्ट आफ्रिका.

या मित्रत्रयांस प्रेमाची खूण म्हणून हें
लघुकाव्य अर्पण केलें असे.

राधारमण.

# " प्रकाशकाचे दोन शब्द."

१ " राधारमण " कवीची ओळख महाराष्ट्रवाचकांस तरी नवीन करून देण्याची आवश्यकता नाहीं. " फडणीस काव्य " " आर्यमाताविलाप " व " मोरोपंताचा प्रभुद्रोह " हीं तीन काव्यें आज तीन चार वर्षें महाराष्ट्रवाचकवर्गापुढें आहेतच. या काव्यत्रयीवरून " राधारमण " कवीची गणना आधुनिक प्रमुख कवींमध्यें करण्यास कांहींही हरकत नाहीं. प्रस्तुत कवीचीं वरील काव्यांव्यतिरिक्त कांहीं लहान काव्यें आहेत. त्या काव्यांतील कांहीं भाग मुद्रित झालेले आहेत व कांहीं अमुद्रितच आहेत. मुद्रित झालेले भाग निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या मासिकांतून अथवा वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्यामुळें त्यांचा एकत्र संग्रह झालेला नाहीं. त्या सर्वांचा एकत्र संग्रह करण्याचा आमचा हेतु आहे. त्या हेतूला धरूनच आज आह्मीं " कालचक्र " हें छोटेंसें पण चटकदार काव्य मराठी वाचकांस सादर करीत आहों. प्रस्तुत काव्य रचण्याची स्फूर्ति कवीस कोणत्या प्रसंगानें झाली हें आह्मांस प्रत्यक्ष माहीत असल्यामुळें त्या प्रसंगाचें त्रोटक वर्णन वाचकवर्गाच्या माहितीकरितां आह्मी पुढें देतों. तें वर्णन लक्षांत ठेवून काव्य वाचलें असतां काव्यांतील मर्म व गोडी सहज व सुलभ रीतीनें वाचकांस कळेल. तो प्रसंग येणेंप्रमाणें.

२ इ. स. १८९८ सालीं रा. रा. पुरुषोत्तम अनंत जोशी व रा. रा. केशव वासुदेव मनोहर [ या दोघांबरोबर रा. रा. रामचंद्र गणेश दांडेकर व रा. रा. विष्णुपंत साने हे दोघे गृहस्थ होते ] हे दोन तरुण व धाडसी गृहस्थ आफ्रिकेंत उद्योगधंदा करण्यासाठीं दापोली [जि.

रत्नागिरी ] मुक्कामहून निघाले. वरील दोन तरुण गृहस्थ व प्रस्तुत काव्य रचणारे " राधारमण " कवि यांची बालपणापासून जीवश्च कंठश्च मैत्री. आफ्रिकेंत पोंचून सर्व जम बसण्याला ८।९ महिने लागले. नंतर वरील दोन गृहस्थांनीं आपली जन्मभूमि जें " परशुरामक्षेत्र " तेथील ऋतुमानवृत्त पद्यांतून लिहून पाठविण्याविषयीं प्रस्तुत कवीस विनंति केली. त्या वेळीं " शरदृतु " कोंकणांत चालू होता. कवीनेंही शरत्कालापासूनच ऋतुवर्णन करण्यास आरंभ केला व क्रमाक्रमानें साही ऋतूंचें वर्णन मित्रद्वयीकडे पाठविलें. या कारणामुळेंच प्रस्तुत काव्यांत " शरत्काल " प्रारंभींच वर्णन केलेला आहे. मूळच्या कविकाव्यक्रमांत आह्मीं बदल केला नाहीं. संवत्सररूपी " कालचक्राचे सहा आंस जे सहा ऋतु त्यांचें वर्णन आज आह्मी वाचकवर्गापुढें ठेवीत आहों. हें काव्य कवीचें अगदीं पहिलें होय मागून कांहीं कांहीं फेरफार त्यानें केले आहेत. आमचा प्रस्तुतचा प्रयत्न सफळ झाल्यास पुढें यथावकाश " राधारमणा " चीं इतर काव्येंही छापून प्रसिद्ध करण्याचा आमचा इरादा आहे. कठिण शब्द व स्थळें यांवर भरपूर टिपा दिल्या आहेत, करितां साधारण मराठी जाणणाऱ्या इसमासही हें काव्य सहज समजेल. हल्लीं म्याट्रिकच्या परीक्षेस मराठी भाषा अवश्यविषय झाल्यामुळें त्या परीक्षेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांस या काव्याचे वाचनानें मराठी व संस्कृत या दोन्ही भाषांसंबंधें विशेष फायदेशीर असें ज्ञान होईल.

मुंबई } व्यवस्थापक
सपटेंबर १९०९ } हिंदएजन्सी.

# कालचक्र.

वसंत०—या कालचक्ररचनावचनावलीतें
मांदारपुष्पततिशीं समभाव जीतें
पादांबुजीं रसिकवृंदगजाननाचे
मी अर्पितों प्रचुर भक्तिरसें मनाचे ॥

## *शरत्काल.

उपजातिः—परंपरा मंगल दुर्दिनांची
घेई रजा मेघरवें जनांची
आतां सख्या त्वज्जनिक्षितीला
विभूषवी शारदकाललीला ॥१॥

आरंभ होतां क्षणिं या ऋतूचा
त्वद्देशवासी जन अंबिकेचा
आरंभिती उत्सव उत्सवानें
जो पूर्ण होई विजयोत्सवानें ॥२॥

गिरीशपत्नीपदपूजनाला

---

*आफ्रिकेंत गेलेल्या एका मित्रानें कोंकणांतील ऋतुमानवृत्त विचारल्यावरून साही ऋतूंचें पद्यात्मक वर्णन कवीनें त्या मित्रास संबोधून लिहिलें आहे. १ पावसाचे दिवस २ तुझ्या जन्मभूमीस ३ दसरा. ४ गिरीश ( शंकर ) पत्नी ( स्त्री ) पद ( पाय ) पूजन ( पूजा ) शंकराची स्त्री जी अंबा तिचें पादकमल पूजावयाकरितां.

सुवर्णवर्णा तिलपुष्पमाला
कुमारिका कोमलशा करांनीं
गृहीं गृहीं गुंफिति गुंग गानीं ॥३॥

दलावलीला दसरा तरूच्या
स्थापीतसे पंक्तिस कांचनाच्या
जनां कथी हें जणु थोर तत्व
वस्तूस ये कालवशें महत्व ॥४॥

शुष्यत्तृणाच्छादित पर्वताली
पिशंगवर्णांकित पूर्ण झाली
पयोदराजीविरहासहा ती
यतिव्रतातें जणु होय घेती ॥५॥

जोपासुनी पूर्ववयीं श्रमानें
आणूनियां पक्कदशे क्रमानें
शस्यस्थलीतें जगतीं त्यजोनी
पर्जन्य गेला गमतें निघोनी ॥६॥

---

१ सोन्यासारखा रंग आहे ज्यांचा अशा म्ह. पिंवळ्या २ पानांच्या राशीस. ३ सुकत जाणाऱ्या गवतानें आच्छादित. ४ पर्वत+आलीडोंगरांची रांग. ५ तांबूस, भगव्या रंगानें युक्त. ६ पयोद ( मेघ ) राजी ( पंक्ति ) विरह ( वियोग ) असहा ( जिला सहन होत नाहीं अशी ) डोंगरांची रांग, मेघांचा विरह सहन न झाल्यामुळें जणुं यतिव्रताचा स्वीकार करिती झाली. ७ धान्याची भूमि, शेत.

प्रफुल्ल पद्माकर[1] शोभताती
तारा नभीं दिव्य विराजताती
सुपक्क धान्यें धरिणी विराजे
सख्या, शरत्काल विशेष साजे ॥७॥

विनम्रे[2] शालिप्रसवावलीला
आंदोलितां[3] मारुतमंदलीला[4]
विलोकुनी चित्त कृषीवलाचें[5]
आनंददोलायित[6] होय साचें ॥८॥

निरभ्रता[7]-नील-नभस्तलाची
शोभा तशी शुद्ध जलाशयाची
समान हो; भूवर नाकवास[8]
निर्मी शरत्काल गमे मनास ॥९॥

मंजुस्वना[9] मंदचरा सुशांता
उच्चप्रसूत्यंकित[10] सिंधुकांता[11]
पात्रीं प्रसन्नोदक घेऊनी तें
भेटावया जाति सख्या पतीतें ॥१०॥

---

१ तलाव, सरोवरें २ विनम्र ( वांकलेली ) शालि (भात) प्रसव ( लोंबी, तोरंबी ) आवली ( पंक्ति, रांग ). ३ हालवितां ४ मारुत ( वारा ) मंदलीला (झुळूक) ५ शेतकरी. ६ हर्षानें हेलकावे खाणारें. ७ अभ्र ( मेघ ) त्यांच्या अभावामुळें नीलवर्ण आकाश तलाची. ८ स्वर्गवसती. ९ मंजु ( कर्णमधुर, गोड ) स्वन (शब्द, आवाज़) आहे ज्यांचा अशा. १० उच्च स्थळीं उगम पावलेल्या, पक्षीं. उच्च वंशोत्पन्न. ११ नद्या.

त[1]मालनीलांबरमध्यचारी
सख्या शरत्कांत दिगंत चारी
विराजवी व्योम[2]नदीविशेष
विचित्र ! होतां घनकालशेषें[3] ॥११॥

वर्षाव [4]तारापथ तारकांचा
करी जसा पुष्पतरू फुलांचा
[5]रत्नोपदा दिव्य शर[6]च्छ्रियेला
नभस्तलश्री जणुं दे विशाला ॥१२॥

गृहाग्रभागीं नवशस्यमाला
फांसे करीं, आननिं दुग्धधारा
समर्पुनी लोक [7]समोदवृत्ती
कोजागिरीचा दिन घालवीती ॥१३॥

[8]हरित्तृणास्वादन–पुष्टिशाली
गोवृंदें[9] संपादितवप्रकेली[10]
निशाव[11]सानीं करण्या पसारा
सोडी वनीं गोपसमूह सारा ॥१४॥

---

१ तमालवृक्षाप्रमाणें नीलवर्ण नभोमंडळांतून जाणारा हें २ चें विशेषण. २ आकाशगंगा ( एक विशिष्ट नदी ) ३ शेवट, अंत. ४ आकाश. ५ रत्न+उपदा ( नजराणा ) ६ शरत्काल-श्रीतें ७ आनंदित आहे वृत्ति ज्यांची असे. ८ हरित् ( हिरवें ) तृण ( गवत ) आस्वादन ( खाणें ) तेणें धष्टपुष्ट असा. ९ गाई, बैल यांचा समुदाय. १० वप्रकेली ( गाई, बैल यांची शिंगांनीं व पायांनीं माती उकरण्याची क्रीडा ). ११ पहाट.

तृणाग्रभागीं उदयीं खगाचे
चकाकती बिंदु सदा दवाचे
वाटे तृणश्रीस सुमौक्तिकांनीं
शृंगारितो सूर्य, सख्या करांनीं ॥१५॥

टाकूनीयां सागर पूर्व कोप
स्वीकारितां शांत मनोज्ञ रूप
नौका उरीं पाय तदीय देई
लोकीं मृदुत्वें परिभूति येई ॥१६॥

करी शरच्छ्री गृह सृष्टिरूप
शृंगारुनी उज्वल रम्यरूप
प्रेरी तदर्थीं तव बंधुवर्ग
सदा जनां सद्गुरु हो निसर्ग ॥ १७ ॥

[6]पश्चात्पुरोवर्तिगृहांगणातें
पवित्रवृंदावनभूतलातें
त्वद्देशबंधू गृहभित्तिभाग
संस्कारशाली करिती सरागें ॥ १८ ॥

गमे मना शारदकाल राजा
त्याची दिवाळी जणुं होय भार्जा
येणार ती, यास्तव [9]वीथि मार्ग
शृंगारितो सादर लोकवर्ग ॥ १९ ॥

---

१ रवीचे. २ किरणांनीं पक्षीं हातांनीं. ३ मानहानि. ४ तेंच काम करावयास. ५ सृष्टि. ६ घराच्या मागें व पुढें असलेलें अंगण. ७ सप्रेम, प्रीतीनें. ८ बायको, राणी. ९ बीद.

दीपोत्सव द्रव्य दिसे दुकानीं
पळे घृतामोद सख्या, दिशांनीं
मार्गांतुनी गांधिक लोक जाती
[2]दीपोत्सवोपस्थिति सूचवीती ॥२०॥

[3]कन्या नवोढा शिबिकां[4]धिरूढा
चित्तीं प्रमोदा[5]तिशयोपगूढा
श्वश्रूगृहा सोडुनि मातृगेहा
जाती सख्या, भूषितचारुदेहा ॥२१॥

स्थळीं स्थळीं दीपपरंपरेची
प्रभा, प्रभा सर्व हरी तमाची
शरद्वधू घालुनि हेमभाला
करी गमे मंडित कंठनाला ॥ २२ ॥

[6]वर्षर्तु-कारागत सूर्य चंद्र
जे लोककार्या जपती वितंद्र[7]
विमुक्त होतां जणुं लोक सर्व
दीपोत्सवातें करिती सगर्व ॥ २३ ॥

खाणें पिणें खेळ रुचे जनाला
प्रपंचचिंता न शिवे तयाला

---

१ तुपाचा वास. २ दिवाळीचें समीप आगमन. ३ नवीन लग्न झालेल्या. ४ डोलींत बसून. ५ प्रमोद ( आनंद ) अतिशय ( अतिरेक, परमावधि ) उपगूढ (आलिंगन युक्त). ६ पर्जन्यकाळ हाच तुरुंग त्यांत पडलेले. ७ आलस्यहीन.

चार्वाक[1]शास्त्रोक्त मतें जनाला
येई दिवाळी जणुं सांगण्याला ॥ २४ ॥

दीपोत्सवाच्या परमावधीचा
ये वार तो भौम[2]चतुर्दशीचा
प्रभातकाळीं करिती सख्या रे
स्नानें सुखें मंगळें[3] लोक सारे ॥ २५ ॥

मुहूर्त लक्ष्मीशुभपूजनाचा
पाहूनि हो भाव असा मनाचा
सारूनि साध्याप्रति दूर होतें
कां यत्न हा साधनसंग्रहातें ॥ २६ ॥

आयव्ययाची तुलना कराया
संवत्सरीं लाभ किती? पहाया
वाणिज्य[4]जीवी जन मग्न झाला
त्यावांचुनी अन्य सुचे न त्याला ॥२७॥

**वसंत०**—ओंवाळिते स्मितमुखी भगिनी बिजेला[5]
बंधूस, तो धन यथोचित दे तियेला
संबंधबीज उभयांतिल या प्रकारें
प्रेमांकुरें न विलसेल कसें सख्या रे? ॥२८॥

---

१ खाणेंपिणें, चैन करणें इत्यादि मतें प्रतिपादन करणारा पूर्वी चार्वाक नांवाचा नास्तिक होऊन गेला. २ नरक चतुर्दशीचा. ३ स्नानाचें विशेषण. ४ व्यापारी लोक. ५ भाऊबिजेच्या दिवशीं.

**द्रुतविलंबितः**—शकटपंक्ति पथांतुनि संचरे
उपवनीं जल चंचल वावरे
उदय कुंभज[1] तापस[2] पावला
तुळशितें पतिलाभ घडे भला ॥ २९ ॥

**भुजंगप्र०**—जहाजें शिडें सोडुनी शुभ्र खाशीं
सख्या तोडिती सागराच्या जलाशीं
जणूं तीं मुलें सिंधु[3] वाटे पिता तो
निजांकावरी[4] कौतुकें खेळवीतो ॥ ३० ॥

**उपजातिः**—विभूषिता जी ‘ त्रिपुरी ’ पदानें
ती पौर्णिमा ये सुहृदा[5], क्रमानें
असंख्यदीपावलिच्या मिषें कीं
अद्यापि जागे हरवीर्य[6] लोकीं ॥ ३१ ॥

**पृथ्वीः**—खळे न पळही सख्या विरहताप मच्चित्तिंचा
सुचेल उपभोग रे मग कसा शरत्केलिंचा[7]
“घडो सुखद तेथिंचा[8] ऋतु तुला” पुढें याहुनी
मुळीं न वदवे मला अहह ! ये गळा दाटुनी ॥३२

---

१ घटापासून जन्मलेला. २ मुनि ( अगस्त्य ) ३ समुद्र. ४ आपल्या मांडीवर. ५ मित्रा. ६ शंकराचें शौर्य. ७ शरदृतूंतील क्रीडांचा. ८ आफ्रिकेंतील.

# हेमंतकाल.

उपजाति०—चेतोहरा शारदकाललीला
घेई सख्या कालवशें गतीला
हेमंतलक्ष्मी बहुरूक्षरूपा
त्वज्जन्मदेशीं विचरे विरूपा ॥ १ ॥

स्वीकारिते यद्यपि शीततेला
हेमंतकालांत निशा विशाला
खोडी जणूं हें बहुमान्य तत्त्व
शीतें पदार्थां जडतें लघुत्व ॥ २ ॥

निसर्गसिद्धक्रमलंघनाला
शीता तसें ये बळ पावकाला
जनांस शीतें बहु ताप होई
जो अग्निसंगें विलयास जाई ॥ ३ ॥

होतां प्रभात क्षितिमंडलाशीं
आच्छादिते धूम्रतुषारराशी
वाटे मही शीतनिवारणाला
घेई निजांगावरि शुभ्र शेला ॥ ४ ॥

---

१ सृष्टिसिद्ध नियमांचें उल्लंघन करण्याला. २ अग्नीला ३ त्रास पक्षीं उष्णता. ४ धूर व धुकें यांचें आवरण. ४ थंडी न लागावी ह्मणून.

विलोभवी संप्रति दक्षिणाशो[1]
विप्रा तशी पूर्णपणें दिनेशा
तदाश्रयें आश्रयही द्युतीचो[2]
लोकीं सुमंदद्युति होय साचा ॥ ५ ॥
नेणार हेमंत तरूच्चयाला[3]
क्रमें क्रमें स्थाणु[4]समानतेला
वाटे अपर्णा[5] म्हणुनी घडे ती
लतावली तत्तनुसंग घेती ॥ ६ ॥
भूजन्मदा[6] पीडित फार झाली
शीतें; असें पाहुनि पादपाली[7]
आत्मांगिच्या काढुनि पर्णचैली[8]
आच्छादिते तत्तनु[9] धंन्यशीला[10] ॥ ७ ॥
प्रभातकाळीं हिमें[11]बिंदुलिप्ता
वाटे वनश्री रडते सुतप्ता[12]
स्वपुष्पपत्रावलिवित्तभार[13]
कीं ने हरोनी हिमकालचोर ॥ ८ ॥
जो आत्मरूपीं शिव विष्णु धाता[14]

---

१ दक्षिण दिशा, पक्षीं दक्षिणा मिळण्याची आशा. या वेळीं सूर्य दक्षिणायनांत जातो व त्याचें तेज मंद होतें. २ तेज. ३ वृक्षसमुदायास. ४ खुंट पक्षीं शंकर. ५ पर्णहीन पक्षीं पार्वती. ६ भूमाता. ७ वृक्षपंक्ति. ८ पर्णरूपी वस्त्र. ९ भूमातेची कुडी. १० पादपालीचें विशेषण. ११ दवाचें बिंदूंनीं युक्त. १२ अत्यंत दुःखित. १३ आपलीं फळें व पुष्पें हीच संपत्ति. १४ ब्रह्मदेव.

आणूनियां तोषवि अत्रिकांतों
त्या श्रीगुरूचा शुभ जन्मवार
आनंद दे भक्तजनां अपार ॥ ९ ॥

बालातपें सारवि ज्यास मित्रे
वृंदावनीं त्या बसुनी पवित्र
संपादिती शीतविकंपितांगा
वेणी फणी या ललना शुभांगा ॥ १० ॥

बकूल वृक्षीं पिकल्या फळांनीं
स्वचंचुशोभा हरिली ह्मणोनी
शुकावली चंचुपुटें कठोर
करी सरोषी जणुं त्यां प्रहार ॥ ११ ॥

पाषाणखंडें बदरीतरूला
पांथस्थ हाणी परि तो तयाला
अर्पूनियां गोड फळें निवारी
शत्रूसही सज्जन सौख्यकारी ॥ १२ ॥

निप्पेषयंत्रस्थित इक्षुदंड
देई सुधातुल्यरसा उदंड
विशेष शोभे गुण संकटांत
मित्रा, जसा दीप महातमांत ॥ १३ ॥

---

१ अनुसूया. २ सकाळचा कोमल सूर्यप्रकाश. ३ सूर्य. ४ थंडीमुळें ज्यांचें अंग कांपत आहे अशा. ५ पोपट. ६ रागावलेली. ७ बोर. ८ चरक. ९ अमृतासारख्या.

शुद्धद्वितीयाशशिखंडरूपा
फलावली तिंतिडिंची सुरूपा
हेमंतलक्ष्मीश्रुतिभूषणांची
करी अपेक्षा जणुं पूर्ण साची ॥ १४ ॥

येई न येई उदया मरीची
ज्या लाभली संगति ती धनाची
तों आप्तबंधूसह सुप्रसन्न
आस्वादिती लोक सुमिश्र अन्न ॥१५॥

विलासवांच्छा विषयी जनांला
व्यायाम मल्ला बहुता क्षुधेला
सुपक्वता पूगफलावलीला
ही भेटवी रे हिमकाललीला ॥ १६ ॥

वसंतति०—झोंबे तनूस, अधरीं वितरी क्षतातें,
योजी प्रयत्न तनुवस्त्रविकर्षणातें,
सीत्कारशब्द करवी, हिमकालवात
जारापरी विलसतो ललनाजनांत ॥१७॥

द्रुतविलं०—हिमतुषारहता बहु कोमली
न विसिनी प्रसवे कमलावली

---

१ शुद्ध पक्षांतीलद्वितीयेच्या चंद्रकोरीप्रमाणें आहे आकार जीचा अशी. २ चिंच. ३ सूर्य. ४ धनराशीची. ५ खिचडी. ६ पोफळीच्या फळांस. ७ दवाच्या बिंदूंनीं विध्वस्त झालेली. ८ कमलिनी.

कमललोचनहीन सरोमुख
लव न दे नयनां सखया सुख ॥ १८ ॥
कुसुमगंधभरा विखुंरी खुंरी
पनसें बालफलप्रसवा वरी
मुकुंल अस्फुट तो सहकारें वी
मकरसंक्रमणार्थ निघे रवी ॥ १९ ॥

**मालिनी०**—"मधुर तिळ गुळा या घे सदा गोड बोल"
श्रवणसुखद जे ते बोलती गोड बोल
अहह ! जरि मला हा अंतरे लाभ नामी
तुज तिळ गुळ द्याया योजिली योजना मी २०

**वसंत०**—हा लेखरूप हलवा तुजला अपूर्व
म्यां धाडिला सुसखया बहुभक्तिपूर्व
वाटो तुला सरस नीरस वा कसाही
घे गोड मानुनि, सखा सखिदोष साही ॥२१॥

---

१ पसरी. २ वनस्पतिविशेष. ३ फणसाचें झाड. ४ मोहोर. ५ आम्रवृक्ष. ६ कर्णमधुर. ७ युक्ति. ८ मित्र. ९ मित्राचा दोष. १० सहन करितो.

# शिशिरकाल.

द्रुतविलंबितः—

वितरुनी[१] निज वार्षिक भेटिला
समय हैमनें[२] संप्रति चालला
सहित घेउनियां निजसंपदा
शिशिर तो शिरतो ऋतु तत्पदीं[३] ॥ १ ॥
सकल-मंगल-मंदिर सुंदर
वितरि जो बहु विघ्नदरीं[४] दरें[५]
गणपं[६] उत्सविं तो स्तविती जन
भजन-पूजन-पूर्ण-पराधिन ॥ २ ॥
रुचिर मंजरि[७]-गुच्छ-परंपरा
निघत भेदुनि पर्णपुटोदरा[८]
बहुत आम्रतरूप्रति वांकवी
उपवना[९] पवनाकुल[१०] शोभवी ॥ ३ ॥
भ्रमरपुंज[११] सुमंजुलें[१२] गुंजतां[१३]
मधुपुटा[१४] सहकार[१५]-सुमस्थिता
अमरवर्ग[१६] जसा असितीं[१७] विधू[१८]
करितसे रिते[१९] सेवुनियां मधू ॥ ४ ॥

---

१ देऊन. २ हेमंतऋतुविषयक. ३ हेमंत ऋतूच्या जागीं ४ विघ्नांच्या भीतीस. ५ भय ६ गणपती. ७ मोहराच्या घडांची रांग. ८ पानांच्या घडांतून. ९ बागेस. १० वाऱ्यानें कंपित. ११ भुंग्यांचा समुदाय. १२अतिशय मधुर. १३ गुंजारव करणारा. १४ मधाचा कोश. १५ आंब्याच्या फुलांमध्यें असलेला. १६ देवगण. १७ कृष्णपक्षीं. १८ चंद्र. १९ रिकामा.

रुचिर आम्रभवा[1] विटपावली[2]
कुसुमिता सुषमा[3] बहु पावली
जशि सख्या मधुर-स्मित-संगता
सुतनुची[4] तनुची रमणीयता[5] ॥ ५ ॥
कुसुमगुच्छ जया नच शोभवी
ललित[6] पल्लव तो सहकार वी
समयिं कांहितरी गुण दावुनी
जनमना नमनार्ह हरी गुणी ॥ ६ ॥
झुलति मंजुल मंजरि एकतः[7]
ललित लोहित[8] पल्लव अन्यतः[9]
जणु जरी-पदरी पट[10] अर्पितो
स्वतनुला तनु[11] लाल रसालें[12] तो ॥७॥
विपुल[13]-शीतज-ताप-कदर्थिता
अवनिची[14] तनु[15] देखुनि दुःखिता
मधुमिषें[16] सहकारतरुच्छवी[17]
सकरुणा करुणारस दर्शवी ॥ ८ ॥
सुमसमुच्चय[18] चूतजें[19] चारुसा[20]

---

१ आंब्यापासून उत्पन्न झालेली, आंब्याची. २ शाखा पंक्ति. ३ अतिशय शोभा. ४ सुंदर स्त्रीची. ५ सुंदरता, शोभा. ६ सुंदर. ७ एका बाजूस. ८ लाल, तांबडे. ९ दुसऱ्या बाजूस. १० वस्त्र. ११ बारीक. १२ आंब्याचें झाड. १३ अतिशय थंडीच्या त्रासानें पीडित झालेली. १४ पृथ्वीची. १५ शरीर. १६ मधाच्या मिषानें. १७ आम्रवृक्षश्री. १८ पुष्प समुदाय, मोहोर. १९ आंब्याचा. २० सुंदर.

कुसुम[1]सायकसायकसा कसा
शिवतसे शिवरात्रिस जो महा
अशिव[2]पा शिव[3]पादसरोरुहा ॥ ९ ॥
शिशिरर्तों[4] क्रमपूर्व सख्या कमी
करित, हा हुतवाह[5]-समागमी
उदय पावत फाल्गुन भूवरी
मुखर्रता[7] खरतों *जनता वरी ॥१०॥
अशुभ अश्लिल भीतिद भाकड[6]
रजनिच्या मुखि आरड ओरड
परिसुनी जणु धूर्ततरुच्छलें[8]
शिशिर हा शिर हालवि आपुलें ॥११॥
जनने[9]-वर्धन-संसृति-कारण
युवति दुर्बल, त्यांस अकारण
जन कृतघ्नचि योजिति निंदण्या
स्वरसें[10]ना रसें नारक[11] चाटण्या ॥१२॥
अशुभ[12]-शब्द-शरावलि भासुरा
चरचरा चिरि काळिज निष्ठुरा

---

१ कुसुमसायक (मदन) सायक ( बाण ) सा (सारखा) २ अशिव ( अशुभ ) पा ( रक्षण करणाऱ्या.) ३ शंकराच्या पदकमलास. ४ थंडी. ५ अग्निसहवर्तमान. ६ आरडाओरड करण्याची वृत्ति. ७ मूर्खपणा. *जनसमूह. ८ हलणाऱ्या झाडांच्या मिषानें. ९ जन्म देणें, संगोपन करणें, संसार चालविणें इत्यादि गोष्टींस कारणीभूत. १० आपली जीभ. ११ नरकसंबंधी रस. १२ अश्लील शब्दरूपी बाणांची पंक्ति.

म्हणुनि झांकिती नेत्र समूर्च्छना
धवरता[1] वरतामरसानना[2] ॥ १३ ॥

फरफरां नर निर्दय ओढिती
युवतिंची पथिं लाज समूळ ती
जणु तयां गृहिणी भगिनी नसे
न जननी[3] जननी[4] जननो[5] असे ॥१४॥

वदन ईश्वरनाम न घे कदा
कर कधीं नच वंदिति तत्पदीं[6]
श्रमतसे अबलां छळण्या परी
उभयही भयहीन परोपरी ॥१५॥

नरक सद्ममुखीं[7] परिषिंचिती
नरक तुल्य कुशब्दहि बोलती
तनुस पंच न जों असु[8] सोडिती
सुनर कां नरकांतरिं लोळती ॥ १६ ॥

न वळवी पद उन्नतिच्या पथा
अवनतीप्रति पाववि सर्वथा
अहह ! तो जनधर्म *सुहृद्वरा
विहितें[9] का ? हितें[10] का ? वद का खरा? ॥१७॥

---

१ पतिव्रता. २ वर ( श्रेष्ठ ) तामरस ( कमला ) प्रमाणें आहे आनन ( मुख ) ज्यांचें अशा स्त्रिया. ३ माता. ४ उत्पन्न करणारी. ५ जन्मास. ६ ईश्वराचीं पावलें. ७ घराच्या अग्रभागीं. ८ प्राण. * मित्रश्रेष्ठा. ९ वेद प्रतिपादित. १० कल्याणप्रद.

विषयसंगरसीं मन रंगवी
षडरिभंग[1] न जो परिवर्तवी[2]
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का? वद का खरा ? ॥१८॥

सुनय[3] कल्पतरू लय पाववी
अनय[4]-दुर्विषपादप वाढवी
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का? वद का खरा ॥ १९ ॥

त्रिदिवमार्ग[5] निरुद्ध[6] करी जसा
निरयमार्ग[7] समग्र खुला तसा
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का ? वद का खरा? ॥२०॥

श्रुतिस[8] अप्रिय जो भयदायक
उघड जो दिसतो स्मृति[9]दूषक
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का ? वद का खरा? ॥२१॥

शिथिल जो करितो स्थिति[10]बंधनें
वळवितो कुपथीं जनता[11]मनें

---

१ षड्रिपूंचा नाश. २ करी. ३ उत्तम नीतिरूप कल्पतरू. ४ दुर्नीतिरूप वाईट विषवृक्ष. ५ स्वर्गाची वाट. ६ बद. ७ नरकाची वाट. ८ कानास पक्षीं वेदास. ९ स्मरणशक्ति पक्षीं स्मृति ( मनुयाज्ञवल्क्यप्रणीत. ) १० समाजव्यवस्था सुरळीतपणें चालण्याचे नियम. ११ जनसमूह.

अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का ? वद का खरा ? ।।२२।।
सकल फाल्गुनवाङ्मय तें जळो
अशुभ त्या महिन्या क्षय वा मिळो
बधिरभाव जडो अथवा भला
युवतिच्या वतिच्या नरजातिला ।। २३ ।।

**वसंत०**—वस्त्रांवरी परमकुत्सित वर्णमाला[1]
रेखोत लोक पशुचें पद पावण्याला
भित्तीवरी विमल निर्जरमंदिराचे[2]
ती रेखण्या धजति हात कसे कुणाचे ।।२४।।
वाचावया भयद वर्णपरंपरा ती
अंधासमान अबला असमर्थ होती
त्यांच्या मनीं म्हणुनि दुःख मुळीं न दाटे
स्त्रीचें अशिक्षणचि संप्रति लाभ वाटे ।।२५।।
बीभत्स चित्ररचना रचिती अनेक
बीभत्स गायन सरुच्या करितात लोक
बीभत्सभाव धरिती कृति-केलि-वेशीं[3]
बीभत्सता अवतरे तव जन्मदेशीं ।।२६।।
तूं दूर, दूर सुभगा[4] तुज हा प्रकार
पत्रप्रविष्ट परि पाठविला समोर
याकारणें कुपितभाव[5] मनीं न यावा
हा लेख पूर्ण पुरुषोत्तम[6] केशवा वा ।।२७।।

---

१ अक्षरपंक्ति. २ देवळाचे. ३ क्रिया, क्रीडा व पोषाख. ४ सुदैवाच्या मित्रा ५ क्रोध, राग. ६ हीं दोन्ही आफ्रिकेंत गेलेल्या मित्रांचीं नांवें होत.

# वसंतकाल.

उपजातिः—विलुप्त होतां शिशिरर्तु लोकीं
चारुस्वरूपा[1] सखया विलोकीं
विलासिनीशी[2] मधुमास[3]लीला
मोही जनांच्या सखया मतीला[4] ॥१॥
स्वदर्शनें भूषविणार भूमी
आनंददायी ऋतुराज[5] नामी
निसर्ग[6] हा यास्तव शुद्धचारी
तत्स्वागताची करितो तयारी ॥ २ ॥
जी कोमला[7] कोकिलकंठवाणी
हो मुत्सुधेची[8] श्रवणांस खाणी
वाटे मना चारणचारुलीला[9]
दे जागृतीतें ऋतुंच्या पतीला ॥३॥
सुगंधभाराकुल पुष्पलीला[10]
शृंगारिते बा बकुलावेलीला[11]
सख्या जणू ती ऋतुराजयाची[12]
करी सुवासाकुल वाट साची ॥ ४ ॥

---

१ सुंदर. २ सुंदर स्त्रीप्रमाणें. ३ वसंताची शोभा. मधु (चैत्र). ४ मनाला. ५ ऋतूंचा राजा (वसंत). ६ सृष्टि. ७ गोड. ८ मुद् (आनंद) सुधा (अमृत) आनंदरूपी अमृताची. ९ चारण (वैतालिक, भाट) चारु (मनोहर) लीला (गायन प्रवृत्ति). १० अत्यंत सुवासिक पुष्पांची शोभा. ११ बोकळीच्या वृक्षपंक्तीस. १२ वसंताची.

लक्षूनि वर्षप्रतिपन्मुहूर्त
प्रजाजनांना सुखलाभ मूर्त
स्वारी निघाली ऋतुराजयाची
तत्स्वागता पंक्ति दिसे ध्वजांची ॥५॥
लेवूनि अंगीं नग[1] पुष्परूप
शालू तसा पोपटि रम्यरूप
लतातरुश्री जणु होय सिद्ध
स्वामी ऋतूंचा बघण्या प्रसिद्ध ॥६॥
जी शुभ्रवर्णांकित पुष्पमाला
पडे लतामुक्त धरातळाला[2]
पाहूनि ती वाटतसे मनाला
मधूवरी[3] लाजविसर्ग[4] झाला ॥ ७ ॥
सख्या किती मारुत[5] मंद चाले
पूगाग्रपुष्पांकुरगुच्छ[6] हाले
गमे मिषें या ऋतुराजभाळीं
उद्यानभू[7] चामर चारु ढाळी ॥ ८ ॥
मरंदपानीं[8] रत[9] षट्पदाली[10]
सुमंजुगुंजारवसक्त[11] झाली

---

१ दागिने. २ भूतळाला. ३ वसंतावर. ४ लाह्यांची वृष्टि. ५ वारा. ६ पूग ( पोफळीचें झाड ) अग्र ( वरील भाग ) पुष्पांकुरगुच्छ ( अगदीं नवीन शिंपूट ) ७ बागेची जमीन. ८ मरंद ( मध ) पिण्यांत. ९ आसक्त. १० षट्पद ( भुंगा ) आली ( पंक्ति ). ११ कर्णमधुर गुंजारव करण्यामध्यें गुंग.

वसंतसत्कार करावयाला
करी गमे सुस्वर गायनाला ॥ ९ ॥

उभारुनी रम्य नवा पिसारा
मयूर रानीं उडती भरारा
मयूरपिच्छें जणु पुष्पकाला
घाली वनश्री मृदुमारुताला ॥ १० ॥

स्थळीं स्थळीं सुंदर आंबराई
भारें फळांच्या बहु नम्र होई
मधूस ती भेट सुधाफळांची
शाखाकरांनीं जणु देत साची ॥११॥

शीतामुळें वृक्ष लता अनाथ
देखूनि कष्टी ऋतुकालनाथ
पुष्पें फळें पल्लव त्यांस देई
संस्मर्यतेला निज भेट नेई ॥ १२ ॥

जसा जसा स्यंदन भास्कराचा
मित्रा विलंघी पथ उत्तरेचा
तसा तसा रश्मिसमूह[3] त्याचा
धरी महा उज्वल भाव साचा ॥१३॥

अनंत-कुंदादिक-पुष्पजाती
ऋतूंत या सर्व फुलोनि जाती
वाटे मधुश्रीशुभमंदहास
पुष्पच्छलानें करितें विलास ॥१४॥

---

१ वसंत ऋतूस. २ रथ. ३ किरण समुदाय. ४ फुलांच्या मिषानें

तारुण्ययोगें तरुणी सुगात्री
शरत्प्रसंगें [१]विधुयुक्त रात्री
तशी धरित्री ऋतुराजसंगें
विशेष वेधी [२]रसिकांतरंगें ॥ १५ ॥

[३]उत्साहतेजःप्रणयादिपात्र
घडे वसंतीं [४]जडजीवमात्र
[५]शीतव्यथार्ता जणु सृष्टिदेवी
[६]वसंत पुष्टिप्रद काय सेवी ॥ १६ ॥

वनस्थलीनें नव कोमला जी
केली असे धारण पर्णराजी
पाहूनि ती वाटतसे मनाला
वेष्टी धुकें कीं हिरवें वनाला ॥१७॥

फुले वनीं [७]किंशुक [८]कर्णिकार
आरक्त शोभे नवपुष्पभार
वाटे मना कीं वन भक्तिशाली
[९]मधुप्रचारार्थ धरी मशाली ॥ १८ ॥

कळी फुले [१०]कांचनकेतकीची
गुंगे तिथें पंक्ति सख्या [११]अलींची

---

१ चंद्रप्रकाशित रात्र. २ रसिक जनांचीं मनें. ३ हिंमत, बळ, प्रेम इत्यादि अंगीं भरण्यास पात्र. ४ सचेतन व अचेतन सर्व सृष्टि. ५ थंडीच्या तापानें पीडित झालेली. ६ ऋतु पार्क्षी वसंत ( औषध ). ७ पळस. ८ पांगारे. ९ वसंतऋतु रानांतून गमन करीत असतां. १० सोनकेतकीची. ११ भुंग्यांची.

अद्यापिही शाप तिला शिवाचा
कलंकवी कीं अलिरूप साचा ॥१९॥
प्रफुल्ल पुन्नाग विशेष शोभे
त्याच्या सुगंधा जनचित्त लोभे
वसंतलक्ष्मीशुभदर्शनातें
ये कृत्तिकापुंजाचि भूतलातें ॥२०॥
न शक्त आतां सहण्या श्रमातें
पाश्चात्य-विद्या वरि विश्रमातें
निवासजन्मस्थळ शीतदेश
पोळे जणूं यास्तव ती विशेष ॥२१॥
प्रसिद्ध रामद्वय अद्वितीय
तो अंजनीनंदन वंदनीय
ऋतूंत या वार्षिक जन्म घेती
भक्तांस आनंद अपार देती ॥२२॥
वनीं तरूंच्या घन सावलीला
संतोषदात्री बहु जी मतीला
सेवी सख्या झांकुनि लोचनाला
रोमंथलीलारस धेनुमाला ॥ २३ ॥

---

१ भृंगमिषानें. २ उंडीचें झाड. ३ उंडीचें झाड फुललें म्हणजे त्याचे फुलांचे घूड आकाशस्थ कृत्तिकापुंजासारखे दिसतात. तेव्हां वसंताचें मोहक सौंदर्य पाहावयाकरितां नभस्थलांतून कृत्तिकापुंज भूतलावर आला कीं काय असा भावार्थ. ४ इंग्रजी शिक्षण. ५ वसतीचें आणि जन्माचें स्थान. ६ दाशरथि राम आणि परशुराम. ७ मारुति. ८ मौजेनें रवंथ करण्याची गोडी.

चंडस्वरूपी रवि सिद्ध झाला
नानाकरांनीं [1]तनुकर्तनाला
या भीतिनें तोय जलाशयाचें
जाई सख्या [2]भूदरिं खोल साचें ॥२४॥

शीतस्वरूपी उपचार नाना
वसंतकाळीं रुचती जनांना
परोपकारा परि भूमिमाय
जाळूनि घेई निज पूज्य[3]काय ॥ २५ ॥

घटोदरींचें जल थंडगार
आनंद देई रसनेस फार
[4]भुजंगनिर्मोकसमान चीर[5]
काळांत या भूषवितें शरीर ॥ २६ ॥

सुगंधशाली जलसेक ज्याला
पंखा डुले तो डुलवी जनाला
[6]वातायनें मोकळिं मंदिराचीं
[7]प्रभंजना वाहति जाण साचीं ॥ २७ ॥

**वसंततिल:०**—दोलाधिरूढ करुनी शितिकंठजाया[9]

---

१ शरीर छाटून टाकण्याला. २ जमीनीच्या पोटांत. ३ देह. कोकणांत धान्य पेरण्याकरितां जमीन राबून भाजण्याची चाल आहे. ४ सर्पाचे कातेप्रमाणें हलकें व पातळ. ५ वस्त्र. ६ खिडक्या. ७ वाऱ्याला. ८ डोलदाऱ्यांत बसवून. ९ शितिकंठ ( शंकर ) त्याची जाया ( बायको ) दुर्गा.

हारिद्रकुंकुमविधी[१] वनितां[२] कराया<br>
होती समत्सुक सख्या तव धर्मपत्नी<br>
त्या देवतेजवळि हें विनवी प्रयत्नीं[३] ॥२८॥<br>
“ दे अंबिके शुभखने वरदान मातें ”<br>
“ गेले तसे परत आण गृहा तयांतें ”<br>
“ ओटी भरीन तव, ते परतोनि येतां ”<br>
मित्रा पुरे मज पुढें वदवे न आतां ॥२९॥

---

१ हळदकुंकवाचा समारंभ. २ स्त्रिया. ३ प्रयासांनीं.

# ग्रीष्मकाल.

उपजातिः—मार्गस्थ होतां मधुमासलीला
निदाघलक्ष्मी वरि तत्पदाला
मित्रा तिचें मी अवतारवृत्त
यथामती वर्णिन देइं चित्त ॥१॥

उच्चण्डता भास्करमण्डलाची
भासे जनांना परमावधीची
वाटे करांनीं ज्वलदग्निधूली
पेरी महीमंडळिं रश्मिमाली ॥२॥

जसा जसा उच्च चढे पदाला
तसा तसा निष्टुर मित्र झाला
सहस्र पादें करितो प्रहार
ह्मणूनि तापे धरिणी अपार ॥ ३ ॥

घर्मव्यथाव्याकुलमंदवेग
निशंक झाले रविचे तुरंग
लागे सख्या संप्रति त्यांस वेळ
आकाशमार्ग क्रमण्या समूळ ॥४॥

---

१ ग्रीष्मऋतुश्री. २ प्रखरता. ३ किरणांनीं पक्षीं हातांनीं. ४ पेटत असलेल्या विस्तवाचें चूर्ण. ५ सूर्य. ६ सूर्य पक्षीं सोबती. ७ किरण पक्षीं पाय. ८ ऊष्ण होई पक्षीं रागावे. ९ उष्णतेच्या पीडेनें व्याकुल म्हणून हलुहलु चालणारे. १० सगळा.

अदृश्य कीं लोळ [1]हुताशनाचे
निश्वास कीं तप्तमहीमुखाचे
फूत्कार कीं ग्रीष्मभुजंगमाचे
वारे सख्या वाहति चं[2]डें साचे ॥५॥

उग्रस्वरूपी रवि बाह्य अंगीं
[3]रसार्द्ररूपी परि अंतरंगीं
तेणें घडे मान्य तदस्तमान
[4]उदार चित्ता तनुला न मान ॥६॥

संतप्त धूली [5]पवनप्रकीर्णा
दाही दिशा धुंद करी विवर्णा
[6]पांथस्थचक्षुःकमलावलीला
झोंबे जशी ति[7]क्तपरागलीला ॥७॥

चैतन्य जो ओतित जीवलोकीं
येतां खमध्या रवि तो विलोकीं
करी सख्या [8]व्याकुल जीवमात्र
अतिप्रसंगें गुण दोषपात्र ॥ ८ ॥

---

१ अग्नि. २ उष्ण व सोसाट्याचे. ३ रस (पाणी) आर्द्र (द्रवयुक्त ओलें) पृथ्वीवरील पाण्याची वाफ रविकिरणांमुळें होते इकडे कविकटाक्ष आहे. ४ उदार (उदात्त, सुंदर) हे चित्त व तनु या दोहोंचें विशेषण. ५ वाऱ्यानें उधळलेली. ६ वाटसरूंच्या नयनकमलपंक्तीस. ७ तिक्त (तिखट) पराग (चूर्ण) लीला (प्रभाव) ८ हैराण.

ग्रीष्मीं सुमित्रा दिनमध्यकाळ
काळापरी क्रूर गमे कराळ
निर्वीर्य निश्चेतन तप्त शांत
चराचर स्तब्ध दिसे नितांतें ॥९॥

पादप्रहारें व्यथिता खगांचे
छाया धरी पाय सख्या द्रुमाचे
तृष्णास्थिता आश्रय दे पराला
साधु स्वदुःखीं सुखवी दुजाला ॥१०॥

करी जणू भास्कर जातशोष
जलाशयींचें जल नामशेष
तदीयनाशें जलजंतुमाला
हताश होई वश अंतकाला ॥११॥

सह्याद्रिचे दुर्गम घोर रानीं
मध्यान्हकाळीं भडके दवाग्नी
विकर्तन क्रूर--कराल--काय
जाळावया सिद्ध जगासि काय ? ॥१२॥

पक्षी पशू वृक्ष लता अनेक
भक्षी शिखी एकसरें विशंक

---

१ भयंकर. २ अत्यंत. ३ सूर्याचे. ४ वृक्षाचे. ५ वृक्षमूळीं असलेली छाया. ६ तहान लागलेला. ७ सूर्य. ८ कठोर व भयंकर आहे देह ज्याचा असा. ९ अग्नि.

कृष्णस्वरूपा[१] कुलभूमिभागें
दुष्कीर्ति ठेवी जणु पाठिमागें ॥१३॥
महाप्रजापीडक जेंवि भूप
निदाघ दे ताप जनां अमूप[२]
स्वकीयपीडापरिहारपात्र
मेघाकडे लाविति ते स्वनेत्र ॥१४॥
जेथें पडे संशय जीवनाचा[३]
तेथें नसे प्रश्न दुजा छळाचा
सर्वत्र चाले बहु हाय हाय
प्रजा प्रभूतें शरणार्थ जाय ॥१५॥
सख्या कुळें तों तमिं काजव्यांचीं
चकाकती जेंवि फुलें नळ्यांचीं
वर्षर्तुचे अग्रग[४] दूत होती
जनां निदाघातुर धीर देती ॥१६॥
विहंगमांची[५] नव चित्र कांति
सख्या समर्पी नयनांस शांति
जो कालमानोचित होय वेष
सदा जनीं तो विलसे विशेष ॥१७॥
अश्वत्थ[६] जोडी नवपत्रलीला
दे क्षुब्धता भेट पयोनिधीला[७]

---

१ "दुष्कीर्तिचा वर्ण काळा आहे" या कविसांप्रदायाकडे कवीचा कटाक्ष आहे. २ अमर्याद. ३ पाणी पक्षीं जीवित. ४ पुढें धावणारे. ५ पक्ष्यांची. ६ पिंपळ. ७ समुद्राला.

वारा सुटे दक्षिण सांगण्याला
प्रस्थानशाली घनराज झाला ॥१८॥
चालूनियां [1]अंबुद्काल आला
घाला स्वसत्तेवरि घालण्याला
मार्गीं कराया प्रतिरोधें[2] त्याला
मित्रा गमे सिद्ध निदाघ झाला ॥१९॥
दोघे ऋतू हे रणशूर योध
आकाश ही संगरभू[3] अबाध
मेघध्वनींनें करुनी सलामी
आरंभिती तुंबळ युद्ध नामी ॥२०॥
[4]संगर्जिता आक्रमितां नभाला
[5]पयोदपंक्ती गमतें मनाला
तोफा रणीं सोडिति सत्य वीर
व्यापी नभा [6]तन्मुखधूम्रपूर ॥२१॥
[7]तमालनीला [8]नवमेघमाला

---

१ अंबुद ( मेघ ) काल ( समय ) ग्रीष्मऋतूचे महिने ज्येष्ठ व आषाढ. परंतु ज्येष्ठ संपण्यापूर्वींच कोकणांत वर्षाऋतूस आरंभ होतो. ही वस्तुस्थिति लक्षांत आणून वर्षाकाळ ग्रीष्मकाळाचे सत्तेवर घाला घालतो, ग्रीष्म त्यास प्रतिकार करितो व दोघांचें युद्ध होतें इ० कल्पना केलेल्या आहेत. २ प्रतिकार. ३ रणभूमि. ४ गर्जना करणारी. ५ मेघमाला. ६ तोफांच्या तोंडांतून निघालेला पुष्कळसा धूर. ७ तमालवृक्षाप्रमाणें काळी. ८ नवीन मेघांची पंक्ति.

कठोर वर्षे करकावलीला[1]
मनांत येई गुलिका[2] शिशाच्या
परस्परीं सोडिति वीर साच्या ॥२२॥

दिव्यप्रभाभासुरचंचलांगी[3]
विद्युन्नटी[4] नृत्य करी खरंगीं[5]
खड्गास चक्रापरि भोंवळोनी[6]
वाटे रणीं झुंजति वीर दोनी ॥२३॥

संग्राम ऐसा घनघोर होई
कोणी न कोणा जणुं हार जाई
तेव्हां करीं इंद्रधनुष्य मेघ
घेई, करी वृष्टि शरें[7] अमोघ[8] ॥२४॥

प्रत्यक्ष तेजोनिधि भास्कराचे
खंडीतसे जी कर चंड साचे
साहे मुळीं वृष्टि न ती तपाला[9]
युद्धीं अकाळीं[10] विलयास गेला ॥२५॥

---

१ करका ( गारा ) आवली ( पंक्ति ). २ गोळ्या. ३ दिव्य ( विलक्षण तेजस्वी ) प्रभा ( तेज ) भासुर ( दैदीप्यमान ) चंचल ( अस्थिर ) अंग आहे जीचें अशी. ४ विद्युल्लता हीच नटी. ५ आकाशरूपी रंगभूमीवर. ६ वाटोळी फिरवून. ७ शर ( बाण किंवा पाणी. ) ८ निष्फळ न होणारी. ९ ग्रीष्मऋतूस. १० आषाढ सरेपर्यंत ग्रीष्म असावयाचा परंतु त्या पूर्वींच वर्षाकालास आरंभ होतो ह्मणून अकाळीं.

नभस्तळीं अंबुद[1] अंबुवर्षी
शोभे जयश्रीशुभसंगहर्षी
प्रसन्न झाली जलसिक्तगात्री[2]
ग्रीष्मोग्रतापाकुल भूतधात्री[3] ॥२६॥

स्त्रीवर्ग मित्रा वटपौर्णिमेस
जपे कराया वटपूजनास
अखंड[4] सौभाग्ययशोनिधान
मागे तदा तो गुरुभक्तिमान[5] ॥२७॥

प्रभंजनांदोलित[6] मेघराजी
संलग्न[7] झाली गिरिशेखरा[8] जी
पाहोनि वाटे गगनीं भरारी
घेण्या स्वपक्षां[9] गिरि कीं उभारी ॥२८॥

मी ओतितों भूमुखिं जीवनातें[10]
हरी करांनीं[11] सविता तयातें
ह्मणूनि रोषें घनराज साचे
करांस खंडी रवितस्कराचे ॥२९॥

---

१ मेघ. २ पाण्यानें जिच्या शरीरावर सिंचन केलें आहे अशी. ३ पृथ्वी. ४ " मागे " याचें कर्म. ५ भक्तीचें प्रमाण थोर आहे ज्याच्या असा स्त्रीवर्ग. ६ प्रभंजन ( वारा ) आंदोलित ( हेलकावे दिलेली ). ७ लागलेली. ८ पर्वताचे माथ्यास. ९ पूर्वीं पर्वतांस पक्ष होते हें पुराणप्रसिद्ध आहे. १० पाणी. ११ हातांनीं पक्षीं किरणांनीं.

निजांबुधारेसम यत्प्रकाश
करी जनांचा परितापनाश
त्या ग्रासितो मेघ सुधाकराला[1]
स्पर्धा वरी तुल्यगुणाश्रयाला ॥३०॥

द्रुतविलंबितः-नवपयोधरचुंबित[2] पर्वत
जलदकाल[3] करी जणुं धूपित[4]
सकल भूमितळीं अथवा कसा
सुरभिगंध[5] सुटे मनमोहिसा ॥३१॥
सलिलसंततिसिक्त[6] तरू लता
धरिति मोहक उज्वल रूपता
नरकपूर्व चतुर्दशिचे दिनीं[7]
समभिषिक्त[8] जशा नर कामिनी ॥३२॥
मुदितमानस[9] मानव भूतल
करिति सीरमुखोत्कषणाकुल[10]
सतत संततिच्या करण्या हिता
जननि सोशिल ताप न कोणता ॥३३॥

---

१ चंद्रास. २ नवीन मेघांनीं चुंबित ( आच्छादिलेले ) ३ वर्षाकाल. ४ धूप ज्यांच्यापुढें दाखविला आहे असे. ५ मधुर सुवासिक. ६ सलिल ( पाणी ) संतति ( धार ) सिक्त ( शिंपडलेल्या ). ७ नरक चतुर्दशीचे दिवशीं. ८ स्नात. ९ मुदित ( आनंदित ) मानस ( चित्त ) ज्यांचें असे. १० सीर ( फाळ ) मुख ( टोंक अग्र ) उत्कषण ( उखळ ) आकुल ( व्याप्त ) नांगरलेलें.

तृणनवांकुर कोमल कोमल
करिति मंडित हें धरणीतल
घनजलें अभिषिक्त जणूं मही
हरित वस्त्र करी परिधान ही ॥३४॥

**उपजातिः**—सुवर्णवर्णांकित[१] भेक झाले
मुखीं तयांच्या श्रुतिघोष[२] चाले
कीं वेदशून्य द्विजमंडळीस
नेती सख्या ते श्रुतिसंस्मृतीस[३] ॥३५॥

**भुजंगप्रयातः**—
ध्वनी अंबुदाचा वनीं आयकोनी
करी नृत्यलीला शिखी[४] मोद मानी
पयोदा[५] जणूं भेटण्याला अनेक
मिळोनी नभीं उंच जाती बलाक[६] ॥३६॥
निदाघीं मुखा वासुनी प्रेतरूप
सख्या जाहला, तोच कासार[७] कूप[८]
मुखीं दिव्य ओती रसा[९] मेघकाळ
तदा स्वीकरी जीवनाचा[१०] सुकाळ ॥३७॥

**मालिनीः**—
स्फटिक-विमल-तोया मालिका निर्झरांची
झुळु झुळु झुळु वाहे वृत्ति मोही जनांची

---

१ पिंवळे. २ वेदघोष. ३ वेदाची आठवण. ४ मोर. ५ मेघास. ६ बगळे. ७ सरोवर. ८ विहीर. ९ पाणी. १० पाणी पक्षीं जीव.

उपवर दुहितेला तेंवि [1] शस्यावलीला
स्थळिं समुचित सिद्ध स्थापण्या लोक झाला ॥३८॥

**वसंततिलका:—**

देशीं तुझ्या घडति ज्या [2] शुचिकाललीला
त्या सांगण्या तुज यथामति यत्न केला
मित्रा करीं सदयशील तयास मान्य
हें मागणें तुजसि मागतसें न अन्य ॥ ३९ ॥

---

---

१ धान्यपंक्तीस. २ ग्रीष्मऋतु.

# वर्षाकाल.

उपजातिः—धनप्रभूच्या सुखद प्रजेला
पुढील मी वर्णिन राज्यकाला
रुचो तुझ्या तो सखया मतीला
कसा बसा पुत्र जसा प्रसूला ॥१॥

स्थलांतर—प्रापित—शालिपंक्ति
विनम्रशीर्षा गलितांगकांति
मुखावरी अंबुकणांस वाही
स्नुषा जशी नूतन नाथगेहीं ॥२॥

संसर्गरूढप्रणया क्रमानें
नांदे स्थळीं त्या बहु ती सुखानें
अल्पांकुरा श्यामल—चारु—रूपा
भोगी गमे मुग्धदशांस्वरूपा ॥३॥

---

१ मेघ राजाच्या. २ आईला. ३ स्थलांतर (दुसरी जागा) प्रापित (आणलेली, लाविलेली) शालिपंक्ति (भाताच्या रोपांची रांग). ४ विनम्र (लवलेलें) शीर्ष (शिर) जीचें अशी, ५ अंबु (पाणी) कण (थेंब). ६ नवऱ्याचे घरीं; सासरीं. ७ नेहमींच्या सहवासानें जिच्या ठिकाणीं प्रेम उत्पन्न झालें आहे अशी. ८ लहान कोंवळे आहेत अंकुर जीचे अशी. ९ काळसर व सुंदर आहे रूप जीचें अशी. १० बाल्य व तारुण्य या दोन अवस्थामधील स्थिति.

मघाजलद्वारमुखें[1] पुढें ती
मित्रा शिरे यौवनमंदिरांतीं[2]
हरिन्मणिश्रेणिभरें[3] निजांग
शृंगारुनी तोषवि अंतरंग ॥४॥

मेघोदरा पासुनि वारिधारा
अश्रांतवेगें पडतां झरारा
आंग्लांगनावक्त्रशशी[4] सजालें[5]
भासे तसा अंधुक भूमिगोल ॥५॥

नभस्तरूंचे[6] शिखरीं निवास
लाधे न नक्षत्रसुमोच्चयास[7]
वर्षर्तु हा रावण गाढवीर्य[8]
टाकी स्वकारागृहिं[9] चंद्र सूर्य ॥६॥

अमेयतोयद्रविणप्रमत्ता[10]
नदी स्वभावें कुटिलत्वयुक्ता

---

१ मघा नक्षत्राचें पाणी हेंच दार त्यांतून. २ तारुण्यरूपी महालांत. ३ हरिन्मणि ( पाचूचे मणि ) श्रेणि ( पंक्ति ) ४ आंग्लांगना ( मड्डम ) वक्त्रशशी ( मुखचंद्र ) . ५ जाळें घातलेला. ६ आकाशरूपी वृक्षांचे. ७ सुम ( फुलें ) उच्चय ( समूह ). ८ गाढ ( अगाध ) वीर्य ( शौर्य ) ज्याचें. ९ आपल्या तुरुंगांत. १० अमेय ( मोजतां न येण्यासारखें) तोय ( पाणी ) हेंच द्रविण ( धन ) त्याच्या योगानें मदांध झालेली.

मार्गी अमर्याद अशुद्ध सारी
मिठी परी नाथतनूसं मारी ॥ ७ ॥

कधीं कधीं वृष्टि घडे सुयोगीं
सूर्यप्रकाशाकुल भूविभागीं
समानकाळीं सुख दुःख वाटे
हांसे रडे भूमि म्हणूनि वाटे ॥८॥

या पारिजातादि महीरुहांला
आलिंगिते पुष्पविकासलीला
सायंतना पुष्पगणा बघून
स्त्रिया सख्या मोजिति कालमान ॥९॥

देतां रवी दुर्लभ दर्शनाला
सत्कार त्यातें जणु द्यावयाला
सुरांगना इंद्रधनुःस्वरूप
उभारिती तोरण रम्यरूप ॥१०॥

नव्या तृणें श्यामल शाद्वलांत
मंजूलशी पोंवरि वाजवीत
शिलातळीं टाकुनि अंगयष्टी
गोपाल धेनूप्रति रंजवीती ॥११॥

जलप्रवेशें मृदु भूमिपोटीं
रोवूनियां तीक्ष्ण विषाणकोटी

---

१ पतीच्या देहास ( समुद्रास ). २ वृक्ष. ३ संध्याकाळीं फुलणाऱ्या. ४ अप्सरा. ५ कुरणांत. ६ शिंगांचीं टोकें.

कोठें वनीं पुष्ट निनादशाली
करी सुखानें वृष[1] वप्रकेली[2] ॥१२॥
कोठें यदंगीं प्रसवांबु[3] ताजें
उठावया यत्न करी पडे जें
तें चाटण्या पाडस कातराक्षें[4]
सद्यःप्रसूता[5] बहु धेनु दक्ष ॥१३॥
सुहृद्वरा दोन महोक्ष[6] कोठें
आरंभिती मस्तक युद्ध मोठें
निवारण्याला झड पावसाची
धेनू कुठे वाट धरी द्रुमांची[7] ॥१४॥
वत्सोत्सुका धेनु दिनावसानीं[8]
कासेमुळें कुंठित शीघ्रयानीं[9]
गृहाग्रभागीं गृहिणी दिव्यातें
लावीतसे तों परते गृहातें ॥१५॥
निशामुखीं[10] स्नान करूनि गोप
गोमंदिरीं दीप्त धुमीसमीप
प्रसन्न चित्तें निजकंबलाची
जलार्द्रता[11] हारवितात साची ॥१६॥

---

१ बैल. २ वप्रक्रीडा ( शिंगांनीं व पायांनीं जमीन खणण्याची क्रीडा. ) ३ प्रसूतीच्या वेळचें पाणी. ४ भयाकुल आहे दृष्टि ज्याची असें. ५ नुकतीच व्यालेली. ६ मोठे बैल. ७ वृक्षाची. ८ दिवस मावळतांना. ९ त्वरित चालण्यामध्यें. १० रात्रीच्या प्रारंभीं. ११ पाण्यामुळें आलेला ओलेपणा.

गृहीं गृहीं पन्नगपंचमीतें[1]
व्यालग्रही[2] हिंडवितो अहीतें[3]
पाडोनि आधीं दशनां[4] कराळ
न मान त्या जो घडला मवाळ ॥१७॥

धेनुस्तनीं निर्मल दुग्धधारा
महीमुखीं संतत वारिधारा
शिरीं शिवाच्या अभिषेकधारा
ओतीतसे श्रावणमास सारा ॥१८॥

शशांकमौली[5] शुभ सोमवारीं
गौरी कुमारीप्रिय भौमवारीं[6]
तो अंजनीनंदन[7] मंदवारीं[8]
नभीं[9] सुपूज्यत्व धरी शरीरीं ॥१९॥

रत्नाकरीं[10] श्रावण पौर्णिमेला
विक्षोभशांतिप्रद[11] नारिकेलीं[12]
सोडी सख्या नाविक बद्धभाव
निष्ठे नसे कारण-कार्य-भावें[13] ॥२०॥

जन्माष्टमी अद्भुत जन्मलीला
तमालनीला यदुपुंगवाला[14]

---

१ नागपंचमीस. २ गारुडी. ३ सर्पांतें. ४ दांतांस. ५ शंकर. ६ मंगळवारीं. ७ हनुमान्. ८ शनवारीं. ९ नभ (श्रावणमास). १० समुद्रांत. ११ समुद्राचें क्रुद्ध स्वरूप शांत करणाऱ्या. १२ नारळास. १३ विचार. १४ कृष्णाला.

लावी पुन्हां लोकिं करावयास
होई दधि[1]-क्षीर-रसीं विलास ॥२१॥

पिंडी वसे मध्यगता शिवाची
जोडी अशी बा हरतालिकांची
सांगे जना मंगलदायकाची
स्वारी निघाली गणनायकाची ॥२२॥

[2]भक्तावलीचित्तचकोरचंद्रा
[3]प्रधी-धुनीच्या धरणीधरेंद्रा[4]
गृहीं गृहीं मंगलमंदिरातें
आराधिती लोक गजाननातें ॥२३॥

[5]शुकप्रभाश्यामल-शस्य-पंक्ती
क्रमें क्रमें प्रौढ दशेसि येती
तदा तदापांडुर[6] वर्ण सांगे
नवीन पोटीं फलगर्भ वागे ॥२४॥

**भुजंगप्रयातः—**

शिखीच्याँ[7] सुमित्रा रवीच्या कुमित्रा

---

१ दहीं दूध. २ भक्त+आवली ( पंक्ति ) तिचें चित्त ( मन ) हाच चकोर पक्षी त्यास आनंदविणाऱ्या चंद्रास. ३ प्रवी ( तीव्र बुद्धि ) हीच धुनी ( नदी ). ४ पर्वत श्रेष्ठ. ५ पोपटाप्रमाणें हिरवी चार अशी शस्य ( धान्य ) पंक्ति. ६ तद्+आपांडुर ( त्यांचा फिकटसर रंग ) ७ मोर.

जनप्राणयात्रा-निदानत्वपात्रा
घनांच्या प्रभूतें जराकाळ आला
करी क्षीण त्याच्या क्रमें जीवनाला ॥२५॥

**वसंततिलका:-**

ये मास भाद्रपद हा प्रिय भिक्षुकांस
पिंडप्रदान करिती जन पूर्वजांस
शालिप्रभा रुधिरगर्भवती विराजे
वृद्धत्व कालविभवें घनराज साजे ॥२६॥
लोकोपकार करण्या निज जीवनाला
वेंचूनियां जलदकाल सुधन्य झाला
सत्ता सख्या करुनि शारदकाल हस्तीं
लेखासहीत मग संपवितो स्ववस्ती ॥२७॥

---

**मंदाक्रांता-**

आतां सारे रसिक पुरवा एक हें अल्प कोड
माना राधारमण कविचे बोबडे बोल गोड
तेणें माझी श्रमपरिवृता शारदा विश्रमास
सेवोनीयां वरिल मुदिता अन्यकाव्यप्रयास ॥१॥

**संपूर्ण.**

---

१ जन ( लोक ) प्राणयात्रा ( उपजीविका ) निदानत्व ( आदिकारण ) त्यास योग्य. २ ज्ञातारपण.

# आमचीं पुस्तकें

## मोरोपंत.–चरित्र आणि काव्य–विवेचन.

रा. ल. रा. पांगारकर. बी. ए. यांनीं महाराष्ट्रकवि मोरोपंत यांच्या चरित्राचीं साधनें जुळविण्यांत व त्यां कवितेची लोकांस गोडी लावण्यांत काय परिश्रम केले अ त, हें महाराष्ट्रास महशूर आहेच. या ग्रंथांत एकंदर प्रकरणें असून पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. ग्रंथ महाराष्ट्र भाषेंत केवळ अपूर्व आहे. किं. रु. २ दो पो. व्ही. पी. सह २॥६.

## लो. टिळकांचें चरित्र व उक्ति.

रा. ल. रा. पांगारकर. बी. ए. यांनीं थोडक्यांत च कदार लिहिलेलें लो. टिळकांचें चरित्र व त्यांनींच गेल तीन चार वर्षांतलि टिळकांच्या व्याख्यानांतील निवडून व ढलेल्या सिद्धांतरूप १५१ संस्मरणीय उक्ति. किं. ॥४ आ पो. व्ही. पी. सह ॥६.

## सं. सुराविलास नाटक.

राष्ट्रोद्धार. नाटकाचे कर्ते. रा. प्रभाकर यांनीं हें पंचां नाटक रचिलें आहे. ह्यांत मद्यपानाच्या दुष्परिणामाचें उत चित्र वठविलें आहे. किं. ॥८ आणे पो. व्ही.पी.सह ॥१

## राष्ट्रोद्धार.

सुराविलास नाटकाचे कर्ते रा. प्रभाकरकृत. ह्यांत शिवछत्रपति शिवाजीमहाराजांच्या वेळच्या समाजस्थितीचे राजकीय चळवळीचें योग्य दिग्दर्शन केलें आहे. किं. आणे पोस्टेजसह ॥१० आणे.

## बंगाल्यांतील १ लें गुप्त मंडळ.

सचित्र प्रेमवेडा, सायंकाळची करमणूक वगैरे कादं कर्ते. रा. नाथमाधव यांनीं लिहिलेली. ही सद्यःस्थि रील एक ऐतिहासिक, मनोरंजक, व चटकदार काद आहे. या कादंबरींत एकंदर १० प्रकरणें आहेत. किं.॥ बारा आणे. पो. व्ही. पी. सह ॥१४ चवदा आणे.

म्यानेजर–हिंदएजन्सी–माधवबाग, मुंबई.